23 SEP 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. ऑम्वेट यांचे चळवळीतील योगदान महत्वाचे

## शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या आदरांजली सभेत मान्यवरांचा सूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची सैद्धांतिक, चिकित्सक मांडणी केली. तसेच त्यांचे सामाजिक चळवळीत महत्वाचे योगदान आहे. डॉ. ऑम्वेट यांच्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालवण्याची आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील आयोजित डॉ. गेल ऑम्वेट आदरांजली सभेत मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.गेल ऑम्वेट: सैध्दांतिक आकलन व योगदान" या विषयावर आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी गेल ऑम्वेट यांना अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : आदरांजली सभेत अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. प्रकाश पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. राजन गवस, डॉ. भारत पाटणकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

डॉ. पाटणकर म्हणाले, डॉ. गेल ऑम्वेट भारतीय ग्रामीण समाजजीवनाशी निष्ठेने आणि मनापासून एकजीव झाल्या होत्या. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या मार्गाने जाऊन बहुविद्याशाखीय सामाजिक संशोधन करण्याची हातोटी त्यांनी आत्मसात केली होती. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचेही यावेळी भाषण झाले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. गेल यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्राला दिलेले योगदान अतुलनीय व अमूल्य आहे.

माजी समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महाजन, अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. कांबळे, शारदाबाई अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, डॉ. जगन कराडे यांनी मनोगते व्यक्त केले. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. अमोल मिणचेकर यांनी सूत्रसंचालन केले.यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह निवडक ५० निमंत्रित उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अन्य अधिकारी, शिक्षक.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : थोर समाजसुधारक, शिक्षण प्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, विलास सोयम, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. मीना पोतदार, डॉ. एम. टी. गोफणे उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

थोर समाजसुधारक व शिक्षण प्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, विलास सोयम, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. मीना पोतदार, डॉ. एम.टी. गोफणे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते

लोकमत

# कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती बुधवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्ते कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यापूर्वी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, विलास सोयम, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

23 SEP 2021 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील अभ्यासिका खुली

## दोन्ही लस घेऊन १४ दिवस झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका आणि स्टडी सेंटर अभ्यासिका बुधवारी ५० टक्के उपस्थिती व शासनाच्या कोविडविषयक नियमावलीच्या अधीन राहून विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात आली. सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत या अभ्यासिका खुल्या राहणार आहेत. वर्षभरानंतर अभ्यासिका खुल्या झाल्याने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.




शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका आणि स्टडी सेंटर अभ्यासिका बुधवारी ५० टक्के उपस्थितीच्या नियमानुसार खुली करण्यात आली.

शासनाचे नियम, जिल्हा प्रशासन आणि विद्यापीठ प्रशासन यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या कोरोनाबाबतच्या आदेशांचे पालन करणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक असणार आहे. अभ्यासिकेत बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कोरोनाच्या लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण होऊन चौदा दिवस झाल्याची खातरजमा करण्यासाठी लस घेतल्याचे प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्षातील २०२०-२१ या वर्षातील प्रवेशित पदव्युत्तर विद्यार्थी, एम.फिल., पीएच.डी. व संशोधक विद्यार्थ्यांकडे ज्ञानस्रोत केंद्राचे अथवा स्टडी सेंटर विभागाचे चालू वर्षीय ओळखपत्र असणे आवश्यक आहे. कार्यालयीन सुट्टीदिवशी, प्रत्येक रविवारी, दुसरा व चौथा शनिवार दोन्ही अभ्यासिका पूर्णपणे बंद राहतील. राज्य शासन, जिल्हा आणि विद्यापीठ प्रशासन नियमानुसार पन्नास टक्के विद्यार्थ्यांनाच मुख्य अभ्यासिकेत प्रवेश दिला जाईल. अभ्यासिकेत विद्यार्थ्यांनी योग्य शारीरिक सुरक्षित अंतराबाबतचे नियम पाळून बसावे, असे आवाहन ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी बुधवारी केले आहे.

लोकमत

# नवतंत्रज्ञानामुळे भाषा करिअरचे दालन खुले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवतंत्रज्ञानामुळे भाषेतील करिअरचे दालन खुले झाले असून, विद्यार्थ्यांनी भाषेतील व्यावसायिक प्रवर्तक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्राचे अभ्यागत अधिव्याख्याता डॉ.हिमांशु स्मार्त यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे आयोजित 'उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी' या विषयावरील ऑनलाइन करिअर मार्गदर्शन व्याख्यानमालेतील पहिले पुष्प त्यांनी गुंफले. त्यांनी 'मराठी विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
23 SEP 2021
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलांची दिशा वेळीच ओळखा

## अनिल कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमाला सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हवामान बदलांचा सर्वाधिक परिणाम बर्फाळ प्रदेशावर होतो. बर्फ वितळून उद्भवणाऱ्या आपत्तीला येत्या ३० ते ५० वर्षांत सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे मानवाने हवामान बदलांची दिशा ओळखून वेळीच सावधगिरीची पावले उचलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीजतर्फे 'हवामान बदल व शाश्वत विकास' या विषयावरील व्याख्यानमाला आयोजित केली आहे. त्यातील पहिले पुष्प डॉ. कुलकर्णी यांनी गुंफले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. हिमनदी तलावांची निर्मिती व त्याचा बेड रॉकवर पडलेला दबाव यामुळे फ्लॅश फ्लडचा धोका अधिक वाढतो. तो टाळणे शक्य आहे. त्यासाठी मॉडेलिंग टेक्निक वापरून व्हेलोसिटी, धोक्याची तीव्रता, हिमनदी तलावांचे स्थान व विस्तार यांकडे लक्ष वेधणे आवश्यक असल्याचे मत डॉ. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. संशोधकांनी मोठ्या प्रमाणावर चिंतन व उपाययोजना करण्याची गरज असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

### लडाखमध्ये बर्फाच्या स्तूपव्दारे पाणी संवर्धन

'पोटेन्शियल ग्लॅशियर रिट्रीट : स्पिती व्हॅली' अभ्यासानुसार, सिंधु खोऱ्यातील स्पिती व्हॅली भागात २०५०पर्यंत जवळपास ६० टक्के, तर २०७०पर्यंत ६६ टक्के बर्फ वितळण्याची शक्यता व्यक्त केली. इतर ऋतूंमधील पाण्याची कमतरता कमी करण्यासाठी लडाखमध्ये बर्फाचे स्तूप निर्माण करुन ७.५ कोटी लीटर पाण्याचे संवर्धन केले आहे. इतर भागांमध्ये हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी चिकित्सा गरजेची असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

लोकमत

# एमएसडब्ल्यूसह वीस परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने एमएसडब्ल्यू (सत्र तीन आणि चार), बी. एस्सी. ॲग्रीकल्चर (सत्र एक ते चार) यासह विविध २० परीक्षांचे निकाल बुधवारी ऑनलाइन जाहीर केले. परीक्षा मंडळाने जाहीर केलेल्या निकालामध्ये बी. आर्किटेक्ट (सत्र दोन), एमबीए (रूरल मॅनेजमेंट सत्र तीन आणि चार), एलएलएम (सत्र एक ते चार), पी. जी. डिप्लोमा इन गांधीयन स्टडिज, एम. एस्सी. एनव्हार्नमेंटल सायन्स (सत्र तीन आणि चार) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., आदी अभ्यासक्रमाच्या पुनर्परीक्षा बुधवारी झाली. त्यासाठी एकूण १ हजार १५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी ९०० जणांनी परीक्षा दिली असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

# ज्येष्ठांनी अल्झायमर समजावून घ्यावा-डॉ.पाटील

कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)-

..............................

आज ज्येष्ठ नागरिकांनी अल्झायमर या आजाराला न भिता तो समजावून घेतल्यास अनेक गोष्टींना प्रतिबंध घालता येईल, असे प्रतिपादन डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर यांचेवतीने अल्झायमर दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी डॉ. पांडुरंग पुजारी होते.

प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक महेश चव्हाण यांनी केले. आभार व सूत्रसंचालन श्रीकांत अडिवरेकर यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव व इतर सहकारी उपस्थित होते.

# डॉ. गेल ऑम्वेट यांचे कृतीशील योगदान मौलिक

## शिवाजी विद्यापीठात मान्यवरांकडून आदरांजली

कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)-

डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची सैद्धांतिक, चिकित्सक मांडणी करण्याबरोबरच सामाजिक चळवळीत दिलेले कृतीशील योगदान मौलिक स्वरुपाचे आहे. त्यांचे हे कार्य समकालीन सामाजिक चळवळीत कार्यरत असणाऱ्यांना मार्गदर्शक आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविणे आवश्यक आहे,असे मत शिवाजी विद्यापीठात आयोजित डॉ.गेल ऑम्वेट आदरांजली सभेत मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ.गेल ऑम्वेट: सैध्दांतिक आकलन व योगदान' या विषयावर सदर सभा आयोजित करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते; तर, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर,ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीला कुलगुरू डॉ.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पाटील आणि डॉ.पाटणकर यांच्या हस्ते डॉ.गेल ऑम्वेट यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांच्यासह निवडक ५० निमंत्रित उपस्थित होते. डॉ.प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक तर, अमोल मिणचेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# सोनाली नवांगुळ यांचे विद्यापीठाकडून अभिनंदन

कोल्हापूर,ता.२१ (प्रतिनिधी)-

..............................

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी येथील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका सोनाली नवांगुळ यांचे त्यांच्या निवासस्थानी विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन केले. सोनाली नवांगुळ यांनी अनुवादित केलेल्या 'मध्यरात्रीनंतरचे तास' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने त्यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ.नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची मुख्य अभ्यासिका, स्टडी सेंटर खुले

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका व स्टडी सेंटर अभ्यासिका बुधवार (दि. २२) पासून ५० टक्के उपस्थिती व शासनाच्या कोरोना नियमावलीच्या अधीन राहून सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ या वेळेत अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी खुल्या राहतील, अशी माहिती संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिली.

अभ्यासिकेत बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडे लस घेतल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्षातील २०२०-२१ या वर्षातील प्रवेशित पदव्युत्तर विद्यार्थी, एम.फिल., पीएच.डी. व संशोधक विद्यार्थ्यांकडे ज्ञानस्रोत केंद्राचे, स्टडी सेंटर विभागाचे चालू वर्षीय ओळखपत्र असणे आवश्यक आहे. अभ्यासिकेत विद्यार्थ्यांनी योग्य शारीरिक सुरक्षित अंतराबाबतचे नियम पाळून बसावे, असे आवाहनही संचालक डॉ. खोत यांनी केले आहे.

2 3 SEP 2021 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजसेवा हेच शासकीय सेवेचे उद्दिष्ट

## विकास खारगे; विद्यापीठात स्पर्धा परीक्षा व्याख्यानमालेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजसेवा हेच शासकीय सेवेचे प्रथम व अंतिम उद्दिष्ट असते आणि ते असलेच पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव विकास खारगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने 'स्पर्धा परीक्षांसाठीची तयारी' या चारदिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेस सुरुवात झाली. त्यावेळी खारगे बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

खारगे म्हणाले, स्पर्धा परीक्षांच्या तयारीची सुरुवात शालेय जीवनापासूनच करावी लागते. शासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षा महत्त्वपूर्ण असतात. त्यासाठी मुळातच आवड असणे गरजेचे आहे. परीक्षेची तयार करताना यश-अपयशाचा विचार न करता स्वयंअध्ययनावर भर द्यावा. चांगल्या लेखकांची पुस्तके वाचावीत. या काळात कुटुंबीयांकडून विद्यार्थ्यांना मानसिक आधार देणे महत्त्वाचे असते.



प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना विविध परीक्षांची तयारी करावी लागते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी पूर्ण यश मिळविण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले पाहिजेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सध्याच्या ऑनलाईन युगामध्ये वावरताना शिवाजी विद्यापीठाचे विविध उपक्रम राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत विस्तारायला हवेत. त्याचा लाभ सर्वदूर पसरलेल्या विद्यार्थी वर्गाला व्हायला हवा. उत्तम नियोजन व कठोर परिश्रमाने विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेस सामोरे जावे.

केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस.कांबळे यांनी प्रास्ताविक केले. अजय कुंभार यांनी आभार मानले.

2 3 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाणिज्य क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी : डॉ. महाजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वाणिज्य शाखेत करिअर करताना विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवावे, जीवन कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभागप्रमुख व प्रा.डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी या विषयावरील आयोजित ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवाडा वाणिज्य क्षेत्रातील करिअरच्या सुवर्ण संधी या विषयावर बोलत होते.

डॉ. महाजन म्हणाले, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये असलेला न्यूनगंड दूर केल्यास विविध क्षेत्रांत निश्चित करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. त्या रोजगाराच्या संधी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी यशस्वी प्रयत्न केला पाहिजे. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. परशराम देवळी यांनी केले.तर आभार सहा. प्रा. दत्तात्रय कमलाकर यांनी मानले.

23 SEP 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलाची दिशा ओळखा : डॉ. कुलकर्णी

## शिवाजी विद्यापीठातर्फे 'हवामान बदल व शाश्वत विकास'वर व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम बर्फाळ प्रदेशावर होतो. बर्फ वितळून उद्भवणाऱ्या आपत्तीला भविष्यात सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे मानवाने हवामान बदलांची दिशा ओळखून वेळीच सावधगिरीची पावले उचलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे (आय.आय.एस.सी.) ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडिजमार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास' या व्याख्यानमालेत 'तापमानवाढ व जलस्रोतांवर होणारा परिणाम' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, हिमालयामध्ये अनेक पर्वतरांगा आहेत. दक्षिणेकडील शिवालिक पर्वतरांग वगळता इतर पर्वतरांगांमध्ये प्रामुख्याने बर्फ आढळतो. हवामान बदलामुळे या नद्या मोठ्या प्रमाणात प्रभावित होतात. हिमालयीन क्षेत्रामधील वाढत्या तापमानामुळे पर्वतरांगांमधील बर्फ मोठ्या प्रमाणात वितळत आहे. वितळलेल्या बर्फामुळे सिंधू खोऱ्यात ७०टक्के पाणीपुरवठा होतो. गंगा नदी खोऱ्यात त्याचे प्रमाण केवळ १०-१५ टक्के असून ब्रह्मपुत्रा खोऱ्यात ते त्यापेक्षा कमी होते. हिमनदी तलावांची निर्मिती व त्याचा बेड रॉकवर पडलेला दबाव यामुळे फ्लॅश फ्लडचा धोका अधिक वाढतो. हा धोका टाळणे शक्य आहे; पण त्यासाठी मॉडेलिंग टेक्निक वापरून फ्लो पाथ, व्हेलोसिटी, धोक्याची तीव्रता, हिमनदी तलावांचे स्थान व भविष्यातील त्याचा विस्तार या गोष्टींकडे नवीन अभ्यासकांनी लक्ष वेधणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हवामान बदलांचे दुष्परिणाम सार्वत्रिक आहेत. मानवी समुदायाबरोबरच पर्यावरणीय संतुलनावरही त्याचा परिणाम होतो आहे. या दुष्परिणामांना अटकाव करण्यासाठी संशोधकांनी मोठ्या प्रमाणावर चिंतन व उपाययोजना करण्याची गरज आहे. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले.

23 SEP 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रमाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याअंतर्गत नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुरातन काळापासून मानवी जीवनातील अमूलाग्र बदल हे साध्या व नावीन्यपूर्ण संकल्पनेतून घडत गेले आहेत. काही लोक संशोधनाद्वारे नावीन्यपूर्णतिला मूर्त स्वरूप देतात. शिवाजी विद्यापीठ अशा सामान्यांतील नावीन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करत आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रांतर्गत 'एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' सेक्शन आठ कंपनी कायदा, २०१३ नुसार रितसर नोंदणी केली आहे. नावीन्यपूर्ण कल्पना केंद्रामार्फत पोहोचवाव्यात. नावीन्यपूर्ण कल्पनांचे अधिकार अबाधित राहतील व त्याची गोपनीयता सांभाळली जाईल. सर्व सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र व काही दर्जेदार, निवडक प्रकल्पांना रोख बक्षीस दिले जाईल. प्रभावी, कार्यक्षम कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विद्यापीठ तांत्रिक सहाय्य प्रदान करणार आहे. यासाठी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या पुनर्परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा दि. १० ऑगस्ट पासून सुरू झाल्या; पण ज्यांना तांत्रिक कारणास्तव परीक्षा देता आल्या नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षा सुरळीत पार पडल्या.

११५१ पैकी ९०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. यात बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी, एम.कॉम, एम.एस्सी. या अभ्यासक्रमांचा समावेश होता. परीक्षा न झालेल्या विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट द्यावी, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजनान पळसे यांनी केले आहे.

2 3 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवस-रात्र असणार आज समसमान

## विद्यार्थी, संशोधक, खगोलप्रेमींसाठी वेगळा अनुभव

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

खगोलशास्त्राशी निगडित घडणाऱ्या विविध बाबी खगोलप्रेमींबरोबरच सर्वसामान्यांनाही आकर्षित करतात. दिवस मोठा, रात्र लहान किंवा रात्र मोठी दिवस लहान, दक्षिणायन, उत्तरायण, सुपरमून यांचे दर्शन अशा काही ठराविक दिवशी घडणाऱ्या दिवसांचे, घटनांचे विशेष अप्रूप असते. गुरुवार (२३ सप्टेंबर) चा दिवसही विशेष आहे. या दिवशी दिवस व रात्र समसमान असणार आहे. बारा तासांचा दिवस व बारा तासांची रात्र अनुभवण्यास मिळणार आहे.

'विषुव दिन' ही एक खगोलशास्त्रीय घटना असून, ती दरवर्षी दोनवेळा घडते. साधारणतः २१ मार्च व २३ सप्टेंबर या दोन दिवशी 'विषुव दिन' पाहावयास मिळतो. यालाच दिवस व रात्र समान असण्याचा काळ म्हटले जाते. 'युक्विनॉक्स' हा शब्द लॅटिन 'अक्विनोशम'पासून तयार झाला आहे. पृथ्वीच्या परिवलन, परिभ्रमण व स्वतःच्या अक्षाभोवती २३.३० अंश झुकल्यामुळे सूर्य उत्तर गोलार्ध ते दक्षिण गोलार्ध व दक्षिण गोलार्ध ते उत्तर गोलार्ध असे भ्रमण करत असल्याचे भासते; पण वास्तविक तो स्थिर असतो.



**जागतिक विषुव दिन विशेष**

पृथ्वीच्या स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरण्यामुळे सूर्यभ्रमण करत असल्याचा भास होतो, यालाच सूर्याचे भासमान भ्रमण म्हणतात. सूर्याच्या या भासमान भ्रमणामुळे २१ जून रोजी सूर्य उत्तर गोलार्धातील २३.३० अंश कर्कवृत्तावर असतो. यावेळेस पृथ्वीचा उत्तर ध्रुव सूर्याकडे कललेला असतो, त्यादिवशी कर्कवृत्तावर सूर्य थेट माथ्यावर येतो व त्याची लंबरूप किरणे तेथे पडतात. यावेळी उत्तर गोलार्धात उन्हाळा असतो. तसेच कर्कवृत्ताच्या उत्तरेला सूर्यकिरणे तिरफी होत जातात, त्यामुळे भारतातील जम्मू-काश्मीर, हरियाणा, पंजाब, दिल्ली ही राज्ये कर्कवृत्ताच्या अतिउत्तरेस असल्यामुळे तेथे सूर्यकिरणे कधीच लंबरूप नसतात.

२१ डिसेंबरनंतर सूर्याचे उत्तरायण सुरू होते व पुढील तीन महिन्यांनंतर सूर्याचे भासमान भ्रमण पुन्हा एकदा २१ मार्च रोजी विषुववृत्तावर येऊन पोहोचते, यालाही 'विषुव दिन' म्हटले जाते. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा पृथ्वीवर दोन्ही गोलार्धांमध्ये समसमान १२ तासांचा दिवस व १२ तासांची रात्र असते. कर्कवृत्त व मकरवृत्तादरम्यान समसमान १२ तासांचा दिवस व १२ तासांची रात्र असतेच; पण जसजसे अति-उत्तर व अति-दक्षिणेस जाऊ, तसतसे दिवस-रात्र समान राहण्याचे प्रमाण सूर्यकिरणांच्या तिरफेपणामुळे विचलित होते. अशा पद्धतीने पृथ्वीच्या स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरण्यामुळे व स्वतःच्या अक्षाभोवती २३.३० अंश झुकल्यामुळे सूर्य भ्रमण करत असल्याचा भास होतो. सूर्याच्या या भासमान भ्रमणामुळे पृथ्वीवर दर तीन महिन्यांनंतर ऋतू पालट होत असतो, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातील भूगोलशास्त्र विभागातील सहायक प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी दिली.

**सूर्याच्या उत्तरायणाची कमाल मर्यादा कर्कवृत्त असून, पृथ्वीवरील उष्ण कटिबंधाची ती उत्तर सीमा आहे. २१ जूननंतर सूर्याचे दक्षिणायन सुरू होते. सूर्य जून, जुलै, ऑगस्ट असा तीन महिन्यांचा कालावधी पूर्ण करत २३ सप्टेंबर रोजी विषुववृत्तावर येतो. म्हणजेच सूर्याची लंबरूप किरणे आता पृथ्वीच्या मध्यावर असणाऱ्या विषुववृत्तावर असतात. त्यामुळे पृथ्वीवर दोन्ही गोलार्धांमध्ये समसमान १२ तासांचा दिवस व १२ तासांची रात्र असते. यालाच 'विषुव दिन' असे म्हटले जाते.**

पुण्यनगरी

# विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक व शिक्षण प्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती बुधवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्प वाहून अभिवादन केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, विलास सोयम, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. मीना पोतदार, डॉ. एम. टी. गोफणे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठाची मुख्य अभ्यासिका खुली

## ५० टक्के प्रवेश; दोन्ही लसी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका व स्टडी सेंटर अभ्यासिका बुधवार, दि. २२ सप्टेंबरपासून ५० टक्के उपस्थिती व शासनाच्या कोविडविषयक नियमावलीच्या अधीन राहून विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात येत आहेत, असे संचालक डॉ. नमिता खोत यांनी कळविले आहे. सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० वा. पर्यंत अशा कार्यालयीन वेळेत अभ्यासिका खुल्या राहतील.

शासनाचे नियम, जिल्हा प्रशासन, विद्यापीठ प्रशासन यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या कोविडबाबतच्या आदेशांचे पालन करणे संबंधित विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांकडे कोविड प्रतिबंधक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्षातील २०२०-२१ या वर्षातील प्रवेशित पदव्युत्तर विद्यार्थी, एम.फिल., पीएच.डी. व संशोधक विद्यार्थ्यांकडे ज्ञानस्रोत केंद्राचे, स्टडी सेंटर विभागाचे चालू वर्षीय ओळखपत्र असणे आवश्यक आहे. प्रत्येक रविवारी, दुसरा व चौथा शनिवार दोन्ही अभ्यासिका बंद राहतील. असे संचालक डॉ. खोत यांनी सांगितले आहे.

23 SEP 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजसेवा हेच शासकीय सेवेचे उद्दिष्ट : खारगे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजसेवा हेच शासकीय सेवेचे प्रथम व अंतिम उद्दिष्ट असते, असले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव विकास खारगे यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मंगळवारी ऑनलाईन पद्धतीने 'स्पर्धा परीक्षांसाठीची तयारी' या चारदिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेस सुरुवात झाली. त्यावेळी खारगे बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

खारगे म्हणाले, स्पर्धा परीक्षांच्या तयारीची सुरुवात शालेय जीवनापासूनच करावी लागते. शासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षा महत्त्वपूर्ण असतात. त्यासाठी मुळातूनच आवड असणे गरजेचे आहे. परीक्षेची तयार करताना यश-अपयशाचा विचार न करता स्वयंअध्ययनावर भर द्यावा. चांगल्या लेखकांची पुस्तके वाचावीत. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी पूर्ण यश मिळविण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले पाहिजेत.

अध्यक्ष कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सध्याच्या ऑनलाईन युगामध्ये वावरताना शिवाजी विद्यापीठाचे विविध उपक्रम राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत विस्तारायला हवेत. त्याचा लाभ सर्वदूर पसरलेल्या विद्यार्थीवर्गाला व्हायला हवा. उत्तम नियोजन आणि कठोर परिश्रमाने विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेस सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले. समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले, तर अजय कुंभार यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# विश्वनाथ गरुड यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने गुरुवार, दि. २३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता पुणे येथील सोशल मीडियाचे तज्ज्ञ विश्वनाथ गरुड यांचे 'कोरोननंतरचा डिजिटल मीडिया' या विषयावर व्याख्यान होणार आहे, ही माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

सकाळ

# स्टडी सेंटर विद्यार्थ्यांसाठी खुले



कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका आणि स्टडी सेंटर अभ्यासिका ५० टक्के उपस्थिती व शासनाच्या कोविडविषयक नियमावलीच्या अधीन राहून विद्यार्थ्यांसाठी खुल्या झाल्या आहेत, असे संचालक डॉ. नमिता खोत यांनी कळविले. सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहापर्यंत अभ्यासिका खुल्या राहतील.

शासनाचे नियम, जिल्हा प्रशासन, विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशांचे पालन विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांकडे कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण होऊन १४ दिवस झाल्याची खातरजमा करण्यासाठी लस घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. शैक्षणिक वर्षातील २०२०-२१ वर्षातील प्रवेशित पदव्युत्तर विद्यार्थी, एम.फिल., पीएच.डी., संशोधक विद्यार्थ्यांकडे ज्ञानस्त्रोत केंद्राचे/ स्टडी सेंटर विभागाचे ओळखपत्र आवश्यक आहे. कार्यालयीन सुटीदिवशी प्रत्येक रविवारी, दुसरा आणि चौथा शनिवार दोन्ही अभ्यासिका पूर्णपणे बंद राहतील. नियमानुसार ५० टक्के विद्यार्थ्यांनाच मुख्य अभ्यासिकेत प्रवेश दिला जाईल. अभ्यासिकेत विद्यार्थ्यांनी योग्य शारीरिक सुरक्षित अंतराबाबतचे नियम पाळून बसावे, असे आवाहनही संचालक डॉ. खोत यांनी केले.

2 3 SEP 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'समाजसेवा हेच शासकीय सेवेचे उद्दिष्ट'

कोल्हापूर, ता. २२ : 'समाजसेवा हेच शासकीय सेवेचे प्रथम व अंतिम उद्दिष्ट असते,' असे मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव विकास खारगे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे ऑनलाईन पद्धतीने 'स्पर्धा परीक्षांसाठीची तयारी' या ऑनलाईन व्याख्यानमालेस सुरूवात झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

खारगे म्हणाले, ''स्पर्धा परीक्षांच्या तयारीची सुरूवात शालेय जीवनापासूनच करावी लागते. शासकीय सेवेसाठी



व्याख्यान मालेत बोलताना खारगे.

स्पर्धा परीक्षा महत्त्वपूर्ण असतात. त्यासाठी मुळातूनच आवड असणे गरजेचे आहे. परीक्षेची तयार करताना यश-अपयशाचा विचार न करता स्वयंअध्ययनावर भर द्यावा. चांगल्या लेखकांची पुस्तके वाचावीत. या काळात विद्यार्थ्यांना कुटुंबीयांकडून मानसिक आधाराची गरज महत्त्वाची असते.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''सध्याच्या ऑनलाईन युगात विद्यापीठाचे विविध उपक्रम राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत विस्तारायला हवेत. उत्तम नियोजन आणि कठोर परिश्रमाने विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेस सामोरे जावे.''

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ''शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना विविध परीक्षांची तयारी करावी लागते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी पूर्ण यश मिळविण्यासाठी अविश्रांत प्रयत्न करावेत.''

केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. अजय कुंभार यांनी आभार मानले.

2 3 SEP 2021

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम जलस्त्रोतांवर

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठात व्याखानमाला

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

हवामान बदलांचा सर्वाधिक परिणाम बर्फाळ प्रदेशावर तसेच जलस्त्रोतांवर होतो. बर्फ वितळून निर्माण होणाऱ्या आपत्तीला येत्या ३० ते ५० वर्षांत आपणास सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे मानवाने हवामान बदलांची दिशा ओळखून वेळीच सावधगिरीची पावले उचलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आय.आय.एस.सी.) चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनेबिलीटी स्टडिज्'मार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. याप्रसंगी 'तापमानवाढ व जलस्त्रोतांवर होणारा परिणाम" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



डॉ. कुलकर्णी म्हणाले, हिमालयात शिवालिक, पीर पंजाल, ग्रेट हिमालय, काराकोरम अशा पर्वत रांगा आहेत. त्यापैकी दक्षिणेकडील शिवालिक पर्वत रांग वगळता इतर पर्वत रांगांमध्ये प्रामुख्याने बर्फ आढळतो. उत्तर भारतात सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या प्रमुख नद्यांची खोरी आहेत. हवामान बदलामुळे या नद्या मोठ्या प्रमाणात प्रभावित होतात. १९६० पर्यंत भारताच्या इतर भागाशी तुलना करता हिमालयीन क्षेत्र थंड होते. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हिमालयीन क्षेत्रामधील तापमान वाढत गेले. वाढत्या तापमानामुळे पर्वत रांगांमधील बर्फ मोठ्या प्रमाणात वितळतो. कमी उंचीवरील बर्फ जास्त उंचीवरील हिमनगांपेक्षा हवामान बदलाला प्रतिसाद देतो. परिणामी, पर्वत रांगांच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकवस्तीची जीवनशैली असुरक्षित होते. सतलज, रावी, बियास, अलकनंदा, चंद्रा, भागीरथी या नद्यांच्या खोऱ्यात गेल्या बारा वर्षातील बदलामुळे ढगफुटी, हिमस्खलन, भूस्खलन अशी अनेक आव्हाने येथील लोकांसमारे आहेत. इतर ऋतूंमधील पाण्याची कमतरता कमी करण्यासाठी लडाखमध्ये बर्फाचे स्तूप निर्माण करून ७.५ कोटी लिटर पाण्याचे संवर्धन केले आहे. इतर भागातही हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी अधिक वैज्ञानिक चिकित्सा होण्याची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हवामान बदलांचे दुष्परिणाम सार्वत्रिक आहेत. मानवी समुदायाबरोबरच पर्यावरणीय संतुलनावरही त्याचा परिणाम होत आहे. या दुष्परिणामांना अटकाव करण्यासाठी संशोधकांनी मोठ्या प्रमाणावर चिंतन व उपाययोजना करण्याची गरज आहे. प्रास्ताविक केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले. डॉ. प्रशांत पाटील, सुधीर पोवार व अभिजीत पाटील यांनी तांत्रिक सहकार्य लाभले.